**ढवण बंदराजवळ**

वण बंदराची वेगाने उभारणी हे. त्यामुळे वाढवण बंदराच्या तही तिसरा विमानतळ ठी उभा करण्यात येईल दी यांनी स्पष्ट केले. यावेळी भाय आणि तांत्रिक माध्यमिक गांमध्ये रोजगारक्षम कार्यक्रम माचेही अनावरण झाले.

पक्ष आणि धनुष्यबाण चिन्हासंबंधी निर्णय द्या, अशी विनंती सिब्बल यांनी केली. प्रकरणाची तातडीने सुनावणी घेण्याची निकड त्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली. यावेळी मिंधे गटातर्फे ज्येष्ठ वकील मुकुल रोहतगी व ॲड. नीरज किशन कौल यांनी युक्तिवाद केला. त्यांनी डिसेंबरमध्ये सुनावणी घेण्याबाबत विनंती केली. दोन्ही बाजूचे युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर खंडपीठाने कपिल सिब्बल यांची विनंती मान्य केली.

। पान ८

न्यायालयाने या प्रकरणाचा लवकरात लवकर फैसला करण्याची भूमिका घेतली. निवडणुका येत-जात राहतील. आता अंतरिम आदेश देण्यापेक्षा मूळ याचिकांवर अंतिम निर्णय देण्याची वेळ आली आहे. आम्हाला हे प्रकरण निकाली काढायचेय, असे स्पष्ट मत न्यायमूर्ती सूर्य कांत यांनी व्यक्त केले होते आणि अंतिम सुनावणी घेण्यास तयारी दाखवली होती. न्यायालयाच्या या भूमिकेमुळे 'तारीख पे तारीख'ला ब्रेक लागला होता.

ग्रीमुळे राज्यात लाखो शेतीचे नुकसान झाले. सारंच उद्ध्वस्त झालं. हेक्टरी किमान ५० रुपये आणि सरसकट कर्जमाफी मिळावी बळीराजा टाहो असताना सरकारने आणि फसवे पॅकेज करून शेतकऱ्यांच्या पाने पुसली. निषेधार्थ आणि ाला न्याय मिळवून ाठी शिवसेनेने बुधवारी ड्यासह राज्यातील सर्व धेकारी आणि तहसील यांसमोर तीव्र निदर्शने

। वृत्त पान ८

## ाऊंटर ीन चिट

ी करण्यात आली या प्रकरणात पोलिसांनी या बचावासाठी अक्षय गोळीबार केल्याचा दावा ने मान्य केला आहे.

ा जिल्ह्यातील बदलापूरच्या ळेत ऑगस्ट २०२४ मध्ये ल्पवयीन मुलींवर सफाई असलेल्या आरोपी अक्षय अत्याचार केल्याचा प्रकार ाला होता. या घटनेनंतर जनक्षोभ उसळला होता.

**मात्र सवाल**

र प्रकरणात क्लीन चिट ाधून नेण्याच्या प्रक्रियेवर

# शताब्दी रुग्णालयात सफाई कर्मचारी काढतात ईसीजी

## मानवाधिकार आयोगाने महापालिकेला ठोठावला १२ लाखांचा दंड



मुंबई, दि. ८ (प्रतिनिधी) - पालिकेच्या चेंबूर येथील शताब्दी रुग्णालयात महिला सफाई कर्मचारीने एका रुग्णाचा ईसीजी काढल्याची गंभीर दखल घेत मानवाधिकार आयोगाने महापालिकेला १२ लाखांचा दंड ठोठावला आहे.

आयोगाचे अध्यक्ष ए. एम. बदर यांनी हा दंड ठोठावला आहे. दंडाची रक्कम महाराष्ट्र विधी सेवा प्राधिकरणाला एक महिन्यात द्यावी. एक महिन्यात ही रक्कम न दिल्यास त्यावर आठ टक्के व्याज द्यावे लागेल, असेही आयोगाने पालिकेला बजावले आहे.

**मानवाधिकाराचे उल्लंघन**

या रुग्णालयातील ईसीजी टेक्निशियनचे पद एक वर्षापासून रिक्त आहे. याने मानवाधिकाराचे उल्लंघन झाले आहे. शताब्दी रुग्णालयात येणाऱ्या शेकडो रुग्णांच्या मानवाधिकाराचे संरक्षण झालेले नाही, असे खडे बोल आयोगाने पालिकेला सुनावले.

**ईसीजी टेक्निशियनची नियुक्ती करा**

येथील ईसीजी विभागात प्रशिक्षित टेक्निशियनची तत्काळ नियुक्ती करा, अशी सूचना आयोगाचे अध्यक्ष बदर यांनी पालिकेला केली आहे.

**वर्षाला ५०१६ ईसीजी**

शताब्दी रुग्णालयात महिन्याला ४१८ तर वर्षभरात ५०१६ रुग्णांचे ईसीजी केले जातात. या सर्व रुग्णांच्या मानवाधिकाराचे उल्लंघन झाले, असा ठपका आयोगाने ठेवला.

**काय आहे प्रकरण...**

सामाजिक कार्यकर्त्या पल्लवी पाटील यांनी ही तक्रार आयोगाकडे केली. शताब्दी रुग्णालयात महिला सफाई कर्मचारी ईसीजी काढत असल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला. आयोगाने याचा खुलासा मागवला. वॉर्डबॉय ईसीजी करत असल्याची माहिती आयोगाला देण्यात आली. ईसीजी प्रशिक्षित टेक्निशियनकडून काढण्यात यावा, असा अभिप्राय देण्यात आला. त्याची नोंद करून घेत आयोगाने पालिकेला चांगलाच दणका दिला.



# शहांपासून सावध राहा!

## ममतांचा मोदींना धोक्याचा इशारा

### मीर जाफरशी तुलना

नवी दिल्ली, दि. ७ (वृत्तसंस्था) - 'अमित शहा हे स्वत:च पंतप्रधान असल्यासारखे वागत आहेत. त्यांच्यावर अति विश्वास ठेवू नका, वेळीच सावध व्हा. ते तुमच्यासाठी मीर जाफर ठरतील,' असा धोक्याचा इशारा पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी आज पंतप्रधान मोदींना दिला.

मतदार फेरछाननीच्या नावाखाली निवडणूक आयोग शहा सांगतील तेच करत आहे, असा आरोप त्यांनी केला. भाजपचे नेते दिल्लीत बैठका घेतात आणि इथे येऊन बंगालमध्ये अमूक अमूक इतके मतदार वगळले जाणार असे जाहीर करतात. त्यावर ममतांनी आक्षेप घेतला.

**कोण होता मीर जाफर?**

मीर जाफर हा हिंदुस्थानच्या इतिहासातील गद्दारीचे प्रतीक मानला जातो. जाफर हा १८ व्या शतकातील बंगालचा नवाब सिराजुद्दौलाच्या सैन्याचा प्रमुख होता. त्याने गुप्तपणे ईस्ट इंडिया कंपनीशी हातमिळवणी केली. प्लासीच्या लढाईत तो इंग्रजांना जाऊन मिळाला आणि सिराजुद्दौलाचा पराभव झाला. तिथेच हिंदुस्थानात ब्रिटिश राजवटीचा पाया बळकट झाला. इंग्रजांनी नंतर मीर जाफरला बंगालचा नवाब घोषित केले.

धीशांवर बूट फेकण्याचा प्रयत्न करणाऱ्याचे नाव राकेश किशोरऐवजी 'असद' असते तर से वागले असते? भाजपवाल्यांनी तर त्याच्या विरोधात आघाडीच उघडली असती. त्याला आयवाला ठरवलं असतं, त्याच्या अटकेची मागणी झाली असती. आता मात्र सगळं शांत आहे. 'हे चुकीचं झालं' एवढं बोलून पंतप्रधान गप्प आहेत.

। **असदुद्दीन ओवेसी,** खासदार, एमआयएम



सामना

# ाल्य निकेतनच्या

# कॉण्ट्रॅक्टरसाठीच भाजप 'बेस्ट' संपवतेय!